# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ३०/०९/२०२२ (शुक्रवार)**

**(सकाळ)**

---

### खून

**पो.स्टे. काटोल** :– अंतर्गत नगरपरिषद कॉम्लेक्स जवळ येथे दिनांक २९/०९/२०२२ चे १६.०० वा. ते दिनांक ३०/०९/२०२२ चे ०९.५९ वा. दरम्यान मृतक नामे– रोहित नारायण बेंबळकर, वय ४६ वर्ष, रा. तळेगाव दशासर, ता. धामणगाव रेल्वे जि. अमरावती यास अज्ञात आरोपीने अज्ञात कारणास्तव कोणत्यातरी जड वस्तुने जबर मारहाण करून त्यास जिवानिशी ठार केले.

सदर प्रकरणी सर तर्फे पोउपनि दत्तात्रय कोलटे पो.स्टे. काटोल यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३०२ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री. आचरेकर हे करीत आहे.

### घरफोडी

**पो.स्टे. उमरेड** :– अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील निसर्ग बार धुरखेडा रोड येथे दिनांक २८/०९/२०२२ चे २३.३० वा. ते दिनांक २९/०९/२०२२ चे ०६.३० वा. सुमारास निसर्ग बार ॲन्ड रेस्टॉरंट ची देखरेख करण्याकरीत प्रदिप दशरथ वाघमारे रा. उमरेड यांना मॅनेजर म्हणुन ठेवण्यात आले आहे. बार मॅनेजर प्रदिप व त्याचा भाउ दिलीप हे दोघे सांभाळतात दि २८/०९/२२ चे रात्री ११.३० वा. पर्यंत बार बंद करून प्रदिप व दिलीप हे घरी निघुन गेले. दि २९/०९/२२ चे सकाळी ०६.३० वा. फिर्यादी नामे– रमेश नामदेवराव खांदाळे, वय ६८ वर्ष, रा. अभ्यंकर चौक, इतवारी पेठ उमरेड यांचे शेतातील नौकर भगवान जाधव रा. उमरेड याने फोन करून सांगीतले की, 'बार चे अर्धे शटर उघडे आहे' असे सांगीतले वरून फिर्यादी यांनी जावुन पाहीले असता बार चे समोरी लोखंडी शटर अर्धवट उघडे दिसले असता त्यांनी आत मध्ये जावुन पाहीले असता बार मधील काउंटर रॅक मध्ये ठेवलेले विदेशी दारू कि. ६२,७४४/–रू. चा माल तसेच काउंटर मध्ये ठेवलेले नगदी १,०००/–रू. असा एकुण कि. ६३,७४४/–रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेल्याचे दिसून आले. रात्री दरम्यान अज्ञात आरोपीने बारचे समोरील लोखंडी शटर मधातुन वरील बाजुस वाकवुन आत मध्ये प्रवेश करून एकुण ६३,७४४/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि बटटुलाल पांडे मो.न. ९७६३७०७९८४ हे करीत आहे.

## रेती चोरी करणारा आरोपी अटक

**१) पो.स्टे. खापरखेडा** :– अंतर्गत १० कि.मी. अंतरावरील मौजा रोहना शिवार ता. सावनेर येथे दिनांक २९/०९/२०२२ चे ०२.३० वा. ते ०३.३५ वा. दरम्यान विना क्रमांकाचा ट्रॅक्टर व ट्रॉलीचा चालक आरोपी नामे– क्र. १) धनराज चिंतामण महालगावे, रा. रोहना, आरोपी क्र. ट्रॅक्टर मालक २) प्रशांत धनराज बहुरूपी राहणार रोहना यांनी संगनमत करून त्यांच्या ताब्यातील वाहनात विना परवाना अवैधरित्या १ ब्रास रेती किं. १,०००/– रू. रेती भरून वाहतुक करतांना मिळुन आले. वाहनासह एकुण ८,००,०००/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार विठ्ठल वंजारी यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, १०९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक सुर्यप्रकाश मिश्रा हे करीत आहे.

**२) पो.स्टे. खापा** :– अंतर्गत खुबाळा येथे दिनांक २९/०९/२०२२ चे १२.१५ वा. दरम्यान विना क्रमांकाचा महिन्द्रा ट्रॅक्टर व ट्रॉलीचा चालक आरोपी चालक/मालक नामे– सुनिल डोंगरे, वय ३२ वर्ष, रा. खुबाळा याने त्याच्या ताब्यातील वाहनात विना परवाना अवैधरित्या १० घमीले रेती किं. ३००/– रू. रेती, ०५ नग लोखंडी पावळे व ५ नग प्लास्टीक घमीले कि. १,०००/–रू. असा एकुण कि. ७,०१३००/–रू. चा मुद्देमाल मिळुन आला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार गंगाधर ठाकरे पो.स्टे. खापा यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक संतोष परतेती मो.क्र. ९११२११७५४७ हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. पारशिवनी** – दिनांक २८/०९/२०२२ चे ०८.०० वा. चे सुमारास पो.स्टे. पारशिवनी हद्दीत फिर्यादी यांची १७ वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला संशयीत आरोपी नामे– विरू शंकर इंगोले, वय २३ वर्ष, रा. सिल्लेवाडा याने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मनोज शेंडे हे करीत आहे.

## फसवणुक

**पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत वार्ड क्र. ३ राय नगर येथे दिनांक १७/०९/२०२२ चे १६.०० वा. चे १६.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– अशोक रामप्रसाद वर्मा, वय ६० वर्ष, रा. वार्ड क्र. ०३, राय नगर कन्हान त. पारशिवनी यांचे मोबाईल वर अज्ञात आरोपीने फोन करून म्हटले की, 'एसबी आय क्रेडीट कार्ड डिपार्टमेन्ट से बात कर रहा हुँ आपका क्रेडीट कार्ड और डेबीट कार्ड बंद हो जायेगा आप ऐनिडेक्स ॲप डाउनलोड करलो' त्यामुळे फिर्यादी याने अज्ञात आरोपीला युपीआय न दिल्याने फिर्यादीचे क्रेडीट कार्ड व डेबीट कार्ड मधुन एकुण ६५,४२३/–रू. धोकाधडी करून एसबीआय बॅक खात्यातुन काढुन घेतले आहेत.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ४२० भादंवि. सीकलम ६६(ड) माहिती तंत्रज्ञान कायदा अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार वरखडे मो. न. ९६३७००५३०३ हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

**१) पो.स्टे. रामटेक :–** अंतर्गत ०८ कि. मी. अंतरावरील मौजा नवरगाव येथे दिनांक २९/०९/२०२२ चे ०८. ०० वा. दरम्यान फिर्यादी यांची पत्नी **कांचन गौरीशंकर बोरकुटे (मृतक), वय ५२ वर्षे, रा. नवरगाव ता. रामटेक** हिचा अचानक छातीत दुखुन तिला चक्कर आला. तिला उपचाराकामी उपजिल्हा रूग्णालय रामटेक येथे नेले असता तेथील डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– गौरीशंकर पांडुरंग बोरकुटे, वय ५२ वर्षे रा. नवरगाव ता. रामटेक यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. रामटेक येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार सुरेश धुर्वे मो. क्र. ९९२२९३५८७८ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. पारशिवनी :–** अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील ग्रामीण रूग्णालय पारशिवनी येथे दिनांक २८/०९/२०२२ चे २३.३० वा. दरम्यान **कु. शितल सिध्दार्थ गायकवाड(मृतक), वय ३६ वर्षे रा. पारशिवनी** हीची अचानक प्रकृती खराब झाली. तिला उपचाराकामी प्रथम साई हॉस्पीटल पारशिवनी व नंतर ग्रामीण रूग्णालय पारशिवनी येथे नेले असता तेथिल डॉक्टरांनी शितल हिला तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– रवि श्रीहरी सुक्रवार, वय ६५ वर्षे रा. ठाकरे लेआउट, अभय नगर नागपूर यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. पारशिवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार जयंत शेरेकर मो.क्र. ८८३०५०९४४१ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. रामटेक :–** अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील सरकारी दवाखाना रामटेक येथे दिनांक २९/०९/२०२२ चे १३.०० वा. दरम्यान फिर्यादीचे पती नामे– **ज्ञानेश्वर सहादेव गुरनुले(मृतक), वय ४३ वर्ष, रा. रामटेक** यांचे दारूच्या अति सेवनामुळे त्यांची प्रकृती खराब होवुन ते मरण पावले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सौ. योगीता ज्ञानेश्वर गुरनुले, वय ३७ वर्ष, रा. रामटेक यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. रामटेक येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक योगेश भुरे मो.न. ७७२२००३६७३ हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यु

**पो.स्टे. वेलतुर :–** अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील येथे दिनांक २९/०९/२०२२ चे ०६.०० वा. ते १०.०० वा. दरम्यान फिर्यादी यांची सुन प्रिती अमोल बन्सोड(मृतक), वय ३१ वर्ष, रा. जिवनापुर .ता.कुही.जि.नागपुर ही स्वता एकटी एकटी राहुन तीचे मानसीक संतुलन बरोबर नव्हते. तसेच तिच्या मुलीही तिच्या सोबत राहण्यास तयार नसल्याने तणावामध्ये घरातील बेडरुमच्या छताच्या पंख्याला ओढणी बांधुन गळफास घेतल्यानंतर ती मृत अवस्थेत आढळून आली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– गं.भा.सयाबाई केवळराम बन्सोड(पाटील) वय ७० वर्षे, रा. जिवनापुर यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. वेलतुर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सपोनी. सतीश पाटील हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर